दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
बुलडाणा, सोमवार, दि.०७ ऑक्टोबर २०२४
वर्ष : ०४, अंक : ५४
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

## आजचा रंग पांढरा



नवरात्रातील पुजल्या जाणाऱ्या दुर्गे मातेच्या पाचव्या रूपाचे नाव स्कंदमाता असे आहे. भगवान श्री स्कंद कुमार यांची ती माता आहे. तिला चार भुजा आहेत. उजवीकडील वरील पूजेमध्ये तिने स्कंद बाळाला धरले आहे, व खालील भुजे मध्ये कमलपुष्प धारण केलेले आहे. तसेच डावीकडील वरच्या भूजेत वरमुद्रा व खालच्या भुजेमध्ये कमलपुष्प धारण केले आहे. स्कंदमाता देवी ही कमळावर विराजमान असते, म्हणून तिला पद्मासना देखील म्हणतात. तिचे वाहन सिंह असून ती हिमालयाची कन्या आहे म्हणून तिला माहेश्वरी किंवा गौरी असेही म्हणतात. तिची मनोभावे भक्ती करणाऱ्यांवर ती आईप्रमाणे प्रेम करते. तिच्या उपासनेने भक्तांच्या सर्व इच्छा पूर्ण होतात. तिच्या सर्व भक्तांना मृत्यू लोकात परमशांती मिळते व मोक्षाचा मार्ग मोकळा होतो.

# पोटच्या लेकींना पित्यानेच नदीत फेकले!

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.६, बुलडाणा :** बुलडाणा जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या पित्याने क्रूरतेचा कळस गाठला! पोटच्या दोन चिमुकल्या लेकींना पुलावरून नदीत फेकले. यामुळे दोन्ही निरागस बालिकांचा करुण अंत झाला. निष्ठुर पित्याच्या या टोकाच्या पावलाने बुलढाणा आणि अकोला जिल्ह्याचा सीमावर्ती परिसर हादरला आहे.



खामगाव (जिल्हा बुलडाणा) ते बाळापूर (जिल्हा अकोला दरम्यान) दरम्यान काल रात्री उशीरापर्यंत हा भीषण घटनाक्रम घडला. बुलडाणा जिल्ह्यातील खाम गाव ग्रामीण, हिवरखेड आणि अकोला जिल्ह्यातील बाळापूर पोलिसांनी खाकीतील 'माणुसकी' दर्शन घडविले! पोलीस हद्द चा बाऊ न करता तिघांनी बाळापूर ते अकोला दरम्यानच्या नदीत बालिकांचा अथक शोध घेतला. अखेर शनिवारी ,५ ऑक्टोबरच्या रात्री दीड ते दोन वाजेदरम्यान दोन्ही बहिणींचे मृतदेह हाती लागले. प्रकरणी पित्यास खामगाव ग्रामीण पोलिसांनी ताब्यात घेतले असून, घरगुती वादातून त्याने हे टोकाचे पाऊल उचलल्याचे प्राथमिक चौकशीत उघडकीस आले आहे. बाळापूर ते अकोला दरम्यान ही जनमानस सुन्न करणारी भीषण घटना घडली आहे. मात्र, आरोपी बुलडाणा जिल्ह्यातील जिल्ह्यातील लोणी कदमापूर या गावातील रहिवासी आहे.तसेच आपल्या मुलींची क्रूर हत्या करण्यासाठी त्यांनी अटाळी (तालुका खामगाव) मधून बाळापूर कडे नेले.यामुळे तपास खामगाव ग्राम ीण पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आल्याचे वरिष्ठ पोलीस सूत्रांनी स्पष्ट केले.

**मुली बेपत्ता झाल्याचा बनाव...**

बुलडाणा जिल्ह्यातील खामगाव तालुक्यातील लाखनवाडा नजिक असलेल्या लोणी कदमापूर येथील आरोपी पित्याचे नाव शेख हारून शेख शब्बीर असे आहे. निर्दयी बापानेच ७ वर्षीय कुमारी सदफ व ९ वर्षीय कुमारी आलिया या दोघा चिमुकल्या बहिणींना बाळापूर (जिल्हा अकोला) नजीकच्या नदीत फेकले. बाळापुर ते अकोला या राष्ट्रीय महामार्गावरील विटांच्या भट्ट्या असलेल्या परिसरात हे कृत्य केले.

त्यापूर्वीकदमापूर येथील शेख हारून शेख शब्बीर यांनी दोन्ही मुली बेपत्ता झाल्याची तक्रार शनिवारी (दिनांक ५) संध्याकाळी पोलिसात दिली होती. आपण दोन्ही मुलींना अटाळी येथून ऑटो रिक्षात बसवून दिले होते, अशी बनवाबनवी करण्याचा त्याने प्रयत्न केला. मात्र, चाणाक्ष पोलिसांना संशय आल्याने आणि त्याच्या बोलण्यात विसंगती असल्याने त्यांनी शेख हारून यावरच शंका आली. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतल्यानंतर खाक्या दाखवताच त्यानेच आपल्या कृत्याची कबुली दिली. आपल्या मुलींचे मृतदेह नदीत फेकल्याची माहिती पोलिसांना दिली आहे. त्याने दिलेल्या माहितीवरून बाळापुर येथील 'बायपास'वरील नदीमध्ये दोन्ही मुलींचा मृत्यू शोधण्यासाठी खामगाव ग्रामीण, हिवरखेड व अकोला पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहे.

# डोंबिवलीत शिंदे गटाला मोठा धक्का...
## युवासेना सचिव दीपेश पुंडलिक म्हात्रे यांचा ठाकरे गटात प्रवेश

**अक्षराज : विनोद वास्कर**



**दि.०६, डोंबिवली (ठाणे) :** महाराष्ट्र युवा सेना सचिव दीपेश पुंडलिक म्हात्रे यांचा आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात मातोश्रीवर वाजत गाजत जाहीर प्रवेश. तसेच माजी नगरसेवक जयेश पुंडलिक म्हात्रे, रत्नाताई पुंडलिक म्हात्रे, सुलोचना नंदू म्हात्रे, संगीता अरुण भोईर, वसंत भगत, संपत्ती ताई शेलार या सर्वांनी सुद्धा प्रवेश केला आहे. यामुळे शिंदे गटाला चांगलाच फटका बसला आहे.

# बदलापूर नंतर संगमनेर हादरले!
## शिक्षकाकडून तिसरीतल्या ५ विद्यार्थीनींसोबत विनयभंग केल्याची धक्कादायक घटना

**अक्षराज : वसंत रांधवण**



**दि.६, संगमनेर (अ.नगर) :** बदलापूर शाळेतील दोन चिमुकल्या मुलींवर सफाई कर्मचारी असणाऱ्या अक्षय शिंदे याने अत्याचार केला होता. त्या प्रकरणानंतर संपूर्ण देशभरात संतापाची लाट उसळली होती. संतापलेल्या बदलापूरकरांनी अक्षय शिंदेला त्वरीत फाशी देण्याच्या मागणीसाठी रेले रोको केले होते. त्यानंतर अक्षय शिंदे एन्काऊंटर करण्यात आले. त्या प्रकरणाची धग अजूनही कायम असताना जिल्हा परिषदेच्या शाळेत पाच मुलींचा विनयभंग करण्यात आला. ज्या शिक्षकांकडे पालक आपल्या मुलांना सोडून बिनधास्त राहतात, ज्या शिक्षकाला गुरु म्हटले जाते, त्यानेच हा प्रकार केला. शिक्षकाने केलेल्या या प्रकारानंतर मुली रडत रडत घरी आल्या अन् काय घडले ते पालकांना सांगितले. अहमदनगर जिल्ह्यातील या घटनेनंतर पुन्हा समस्त पालकवर्ग चिंतेत आला आहे. बाळशीराम यशवंतराव बांबळे असे त्या शिक्षकाचे नाव आहे.

**काय घडला प्रकार ?**

अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यात खराडी जिल्हा परिषद शाळेत तिसरीच्या वर्गात शिकणाऱ्या मुलींशी बाळशीराम यशवंतराव बांबळे या शिक्षकाने असभ्य वर्तन केले. दुपारच्या सुट्टीत एक मुलगी रडत रडत घरी गेली. तिने घडलेला प्रकार पालकाना सांगितला. या प्रकारे इतर चार ते पाच मुलींबरोबरही बाळशीराम बांबळे या शिक्षकाने असभ्य वर्तन केले होते. मुख्यध्यापकांनी त्या सर्व मुलींना बोलवून चौकशी केली. त्यांनी त्या शिक्षकाच्या कारनाम्याचा पाढा वाचला. त्यानंतर पालकांनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

**शाळेत रुजू झाल्यापासून असा प्रकार...**

वर्गशिक्षक बाळशीराम यशवंतराव बांबळे हे शाळेत नव्याने रूजू झाले. ते शाळेत आल्यापासून असे प्रकार करत आहेत. याबाबत मुलींच्या पालकांनी दिलेल्या तक्रारी उल्लेख करण्यात आला आहे. दरम्यान या प्रकरणी पीडित अल्पवयीन मुलीच्या आईने शहर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून पोलिसांनी शाळेतील या शिक्षकाविरुद्ध बिएनएस कलम ७४,७५ बालकांचे लैंगिक अत्याचार कलम ८,१२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख करत आहेत.

# केंद्रात अन् राज्यात तुमचं सरकार, मग स्मारक का झालं नाही?

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.६, मुंबई :** अरबी समुद्रामध्ये २०१६ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याहस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे जलपूजन पार पडले होते. मात्र, त्यानंतर अद्यापही छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे काम झाले नसल्यामुळे आता स्वराज्य पक्षाचे नेते, माजी खासदार संभाजीराजे छत्रपती आक्रमक झाले आहेत. आज ते स्मारकाची पाहणी करण्यासाठी मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया या ठिकाणी दाखल झाले आहेत. यावेळी त्यांना पोलिसांनी रोखण्याचा प्रयत्न केला. यावेळी संभाजीराजे छत्रपती यांनी काही सवाल करत सरकारवर हल्लाबोल केला. केंद्रात तुमचं सरकार, राज्यात देखील तुमचं सरकार, स्मारकाचं जलपूजनही तुम्हीच केलं. मग स्मारक का झालं नाही?, असा सवाल संभाजीराजे छत्रपती यांनी विचारला आहे.

**संभाजीराजे छत्रपती काय म्हणाले?**

आम्ही कोणतेही आंदोलन करण्यासाठी मुंबईत आलेलो नाहीत. खऱ्या अर्थाने आपल्याला अरबी समुद्रातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाचा विषय हा राज्यातील १३ कोटी जनतेपर्यंत घेऊन जायचा आहे. कोणत्याही प्रकारे आपल्याला कायदा हातात घ्यायचा नाही. कायद्याच्या बाहेर जाऊन कोणतीही गोष्ट आपल्याला करायची नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य निर्माण केलं. ते आपले गडकोट किल्ले व्यवस्थित राहिले पाहिजे. त्यामुळे माझा १५ ते २० वर्षांपासून प्रयत्न सुरु आहे. रायगड किल्ल्यावर रायगड प्राधिकरण स्थापन झालं. त्यासाठी मी सरकारला भाग पाडलं. ७५ वर्षांत पहिल्यांदा रायगड किल्ल्याचं सवर्धन सुरु झालं, असं संभाजीराजे छत्रपती म्हणाले.

मुंबईत छत्रपती शिवाजी महाराजांचं मोठं स्मारक व्हावं ही त्यावेळी सर्व नेत्यांची इच्छा होती. २०१० मध्ये तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी सांगितलं की, या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचं स्मारक व्हायला हवं.



त्यानंतर २०१४ मध्ये भारतीय जनता पार्टीने घोषणा केली की आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांचं स्मारक अरबी समुद्रात करणार आहोत. पुढे २०१६ मध्ये मुंबई महापालिका निवडणुकीच्या अगदी आधी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याहस्ते जलपूजन करण्यात आलं.

पंतप्रधान मोदी ज्यावेळी जलपूजन करण्यासाठी येतात, याचा अर्थ तुम च्याकडे सर्व परवानगी आहे. त्याशिवाय देशाचे पंतप्रधान जलपूजनासाठी येणार नाहीत. तेव्हा मी देखील त्या ठिकाणी उपस्थित होतो. मलाही कौतुक वाटलं. मग ज्या प्रकारे सरदार वल्लभभाई पटेल यांचं स्मारक उभं राहिलं. मला तुलना करायची नाही. मात्र, २०१६ मध्ये स्मारकासाठी जलपूजन झालं आणि त्यासाठी एक समितीही स्थापन झाली. मात्र, त्यानंतर पुढे काय झालं?, असा सवाल संभाजीराजे छत्रपती यांनी केला.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाबाबत मी देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर उद्धव ठाकरे यांच्याशीही माझी चर्चा झाली. त्यानंतर आताचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशीही माझी चर्चा झाली. सर्वांना विचारलं की हे स्मारक का उभा राहीलं नाही? तर सर्वांचं उत्तर एकच आलं की पर्यावरणाच्या अडचणी निर्माण झाल्या आणि पुढे हा विषय न्यायालयात गेला. त्यामुळे आम्हाला काही करता येत नाही, असं सांगण्यात आलं. मग आता माझा या सरकारला प्रश्न आहे की, तुमचं केंद्रात सरकार, तुमचं राज्यात सरकार, तुम्हीच घोषणा केली, तुम्हीच स्मारकाचं जलपूजन केलं. मग स्मारक का झालं नाही?, असा सवाल संभाजीराजे छत्रपती यांनी केला.

# वाई विधानसभेतील घराणेशाही विरोधात पुरुषोत्तम जाधव यांनी फुंकले रणशिंग...

**अक्षराज : धर्मेंद्र वर्पे**

**दि.६, महाबळेश्वर (सातारा) :** श्री क्षेत्र महाबळेश्वर ते राजमाता अहिल्यादेवी पुतळा चौक लोणंद असा ३ ऑक्टोबर ते १२ ऑक्टोबर २०२४ जनसंवाद यात्रेचा प्रवास

शिवसेना सातारा जिल्हाप्रमुख पुरुषोत्तम जाधव यांच्या नेतृत्वाखाली क्षेत्र महाबळेश्वर येथून जनसंवाद यात्रेला सुरुवात झाली असून मतदारसंघातील परिवर्तनासाठी नऊ दिवस ही परिवर्तन यात्रा सुरूच राहणार आहे. वाई - खंडाळा, महाबळेश्वर विधानसभा मतदारसंघात आता बदल निश्चित असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली या मतदारसंघाच्या चेहरा मोहरा बदलण्यासाठी आता सर्वांनी एकत्र येऊन घराणेशाही विरोधात लढा दिला पाहिजे तरच आपल्या मतदारसंघाचा आणखी विकास होईल. मतदार संघात नागरिक परिवर्तनासाठी सज्ज झाले असून आता या मतदारसंघावर भगवा नक्की फडकेल, असा विश्वास शिवसेना सातारा




जिल्हाप्रमुख पुरुषोत्तम जाधव यांनी व्यक्त केला.

वाई खंडाळा महाबळेश्वर विधानसभा मतदारसंघातील जनतेशी थेट संवाद साधण्यासाठी शिवसेना सातारा जिल्हाप्रमुख पुरुषोत्तम जाधव यांनी घटस्थापनेच्या शुभमुहूर्तावर महाबळेश्वर प्रतापगड येथून जनसंवाद यात्रेला सुरुवात केली, यावेळी ते बोलत होते. यावेळी संजयसिंह देशमुख वाई विधानसभा संघटक, बाळासाहेब जाधव लहुजी शक्ती सेना सातारा जिल्हाध्यक्ष, वनिता जाधव उपजिल्हा संघटिका महिला आघाडी, तसेच संजय शेलार महाबळेश्वर तालुकाप्रमुख पूर्व, संभाजी भिलारे महाबळेश्वर तालुकाप्रमुख पश्चिम, विजय नायडू महाबळेश्वर शहर प्रमुख, राहुल शिंदे पाचगणी शहर प्रमुख, भूषण शिंदे खंडाळा तालुकाप्रमुख, ज्ञानेश्वर भांडे शिरवळ शहर प्रमुख, भानुदास जाधव संचालक खंडाळा तालुका सहकारी साखर कारखाना, चंद्रगुरुजी ज्येष्ठ शिवसैनिक तथा मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना वाई विधानसभा निमंत्रित सदस्य, तसेच सचिन आवारे, मंगेश खंडागळे, नारायण शेलार, गोपाळ शेलार, मारुती सपकाळ, अविनाश ढेबे सरपंच,बंडा पुजारी,निवृत्ती जाधव सरपंच, संदीप शेलार, राजेश सपकाळ, सागर सपकाळ,सयाजी शेलार सरपंच, राजाराम शेलार, सविता पुजारी, प्रसाद नववरे, नितीन शेलार, ऋषिकेश राजपुरे, विवेक पंडित, महाबळेश्वर तालुक्यातील ज्येष्ठ शिवसैनिक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी क्षेत्र महाबळेश्वर येथे झालेल्या सभेत शिवसेना जिल्हाप्रमुख पुरुषोत्तम जाधव म्हणाले,एकाच घराण्याने अनेक वर्षे लोकसभा, विधानसभा, जिल्हा बँक अध्यक्षपद, साखर कारखाने, बाजार समिती, सरपंच परिषद अध्यक्ष, सरपंच अशा अनेक सत्ता स्वतःकडे ठेवूनही मतदारसंघाचा मात्र विकास ते करू शकले नाहीत.

आता या विभागाच्या विकासासाठी आता परिवर्तन घडवण्याची गरज निर्माण झाली आहे.जनसंवाद यात्रेच्या माध्यमातून पुढील १० दिवस महाबळेश्वर, वाई व खंडाळा या तीन तालुक्यातील सर्व गावात थेट मतदारांशी भेटून आवाहन करणार आहे. महाबळेश्वर येथून जनसंवाद यात्रेला सुरुवात केली, यावेळी ते बोलत होते.

# मुंबईकरांना २४ तास पाणीपुरवठा अशक्य

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.६, मुंबई :** शहराला २४ तास पाणीपुरवठा करणे शक्य नसल्याचा पुनरुच्चार महापालिका प्रशासनाने केला आहे. २४ तास पाणीपुरवठा करण्याइतकी पाण्याची उपलब्धता नसून मुंबईची भौगोलिक स्थिती आणि रचनेमुळे २४ तास पाणीपुरवठा करणे शक्य नसल्याचे प्रशासनाने मान्य केले आहे. त्यामुळे २४ तास पाणीपुरवठ्याचा प्रयोग पूर्णतः गुंडाळण्यात आला आहे.

मुंबई महापालिकेची निवडणूक जवळ आल्यानंतर मुंबईला २४ तास पाणीपुरवठा करण्याचे वचन राजकीय पक्षांकडून दिले जाते. मात्र २४ तास पाणी देणे शक्य नाही, असे मत अधिकाऱ्यांनी व्यक्त केले. २०१४ मध्ये २४ तास पाणीपुरवठा करण्याची घोषणा करण्यात आली होती. पाणीपुरवठ्यात सुधारणा करण्यासाठी पालिकेने हाती घेतलेल्या मुंबई जलवितरण सुधारणा कार्यक्रमांतर्गत वांद्रे व मुलुंड परिसरात २४ तास पाणीपुरवठ्याचा प्रयोगही करण्यात आला होता. त्यावेळी या भागात पाण्याचे तास वाढवण्यात आले होते, पण २४ तास पाणीपुरवठा करता आला नाही. तेवढी पाण्याची उपलब्धता नाही, त्यामुळे ते शक्य नाही, अशी माहिती पालिकेच्या अधिकाऱ्यांनी धरणाच्या अभ्यास दौऱ्यादरम्यान दिली.

# संपादकीय



## 'आखाता'तील संघर्ष वाढणार

मागील वर्षी ऑक्टोबर महिन्यातच हमासने इस्राईल वर हल्ला करून इस्राईलचे १२०० हून अधिक नागरिकांची हत्या करून २५१ नागरिकांचे अपहरण केले होते. हमासच्या या हल्ल्याला प्रतिउत्तर म्हणून इस्राईलने गाझा पट्टीवर वर हल्ला करून गाझा पट्टी अक्षरशः जमीनदोस्त केली. इस्राईलने केलेल्या हल्ल्यात ४२ हजारांहून अधिक नागरिकांचा मृत्यू झाला असून हमासचे १२ हजारांहून अधिक दहशतवादी ठार झाले आहेत. इस्राईल – हमास युद्धाला आज एक वर्ष पूर्ण झाली तरीही त्यांच्यातील संघर्ष संपलेला नाही. इस्राईल – हमास युद्धाला एक वर्ष पूर्ण होत असतानाच इस्राईलने लेबनॉनवर हल्ला केला. इस्राईलने लेबनॉनवर केलेल्या हल्ल्यात लेबनॉन मधील हिजाबुल्ला या दहशतवादी संघटनेचा प्रमुख असलेल्या हसन नसराल्ला हा ठार झाला. त्या अगोदर इस्राईलने लेबनॉनवर पेजर आणि वोकिटॉकी हल्ला केला होता. इस्राईलने लेबनॉन वर हल्ला करण्यामागचे कारण म्हणजे लेबनॉन हमासला करीत असलेले आर्थिक आणि लष्करी सहाय्य. लेबनॉन मधील हिजबुल्ले इस्राईल – हमास युद्धात हमासला आर्थिक आणि लष्करी सहाय्य पुरवत होते इतकेच नाही तर काही हिजबुल्ले प्रत्यक्ष युद्धातही सहभागी झाले होते त्यामुळे त्यांना धडा शिकवण्यासाठी इस्राईलने लेबनॉनवर हल्ला करून हीजबुल्लाना लक्ष केले. इस्राईल – हमास नंतर इस्राईल – लेबनॉन संघर्षाने जग चिंतेत पडले असतानाच या संघर्षात इराणने उडी घेऊन संघर्षाची व्याप्ती आणखी वाढवली फक्त संघर्षाची व्याप्ती वाढवली नाही तर जगाची चिंताही वाढवली कारण इराण हा अरब देशातील किंबहुना इस्लामिक देशातील सर्वात मोठा आणि महत्त्वाचा देश आहे. इस्राईल हमास युद्धात इराणने अपेक्षित उडी घेतल्याने हा संघर्ष आणखी वाढणार हे स्पष्ट झाले. इस्राईल हमास युद्धात इराणने अपेक्षित उडी घेतली असा उल्लेख मी वर केला आहे त्याचे कारण इराण या युद्धात उडी घेईल असा अंदाज गेली वर्षभर लावला जात होता कारण इस्राईल – इराण संघर्ष जगाला नवीन नाही. या आधीही या दोन देशात युद्धाचा भडका उडाला आहे. १९८० सालच्या दशकात तर दोन देशात कायम युद्धाच्या ठिणग्या पडत होत्या त्यामुळे या युद्धात इराण केंव्हाही उडी घेईल असे म्हंटले जात होते ते खरे ठरवत इराणने इस्राईलवर हल्ला करीत २०० हून अधिक क्षेपणास्त्रे डागली. अर्थात इस्राईलने या हल्ल्याचा यशस्वी बचाव केला. यात इस्राईलची म्हणावी तशी हानी झाली नसली तरी या हल्ल्याचा बदला घेतला जाईल असा इशारा इस्राईलने दिला आहे. याचाच अर्थ आगामी काळात इस्राईलकडून इराणवर हल्ला करण्यात येईल आणि जर तसे झाले तर हे युद्ध आणखी वाढू शकेल त्यात अमेरिकेने नेहमीप्रमाणे यात नाक खुपसले आणि इस्राईल पाठिंबा दिला. अमेरिकेने इस्राईलला पाठिंबा दिल्याने इराण आणखी खवळला कारण इराण इस्राईल प्रमाणे अमेरिकेलाही आपला शत्रू मानतो. अमेरिकेत सध्या निवडणुकीची लगबग चालू आहे. या निवडणुकीत राष्ट्राध्यक्ष पदासाठी उभे असलेले डोनाल्ड ट्रम्प यांनी तर इस्राईलला चिथावणी देत म्हंटले आहे की इस्राईलने इराणच्या आण्विक तळावर आणि तेलाच्या विहिरींवर हल्ला करावा. जर मी म्हणजे ट्रम्प जिंकून आलो तर इस्राईलच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून इराणला त्यांची जागा दाखवून देईल. उद्या जर डोनाल्ड ट्रम्प खरेच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बनले तर हा संघर्ष आणखी वाढेल. अमेरिकेने आजवर प्रत्यक्ष युद्धात उतरून इस्राईलला साथ दिलेली नाही मात्र डोनाल्ड ट्रम्प जर निवडून आले तर ते इस्राईलच्या बाजूने प्रत्यक्ष मैदानात उतरू शकतात आणि जर तसे झाले तर आजवर या युद्धात तटस्थ राहिलेले इजिप्त, जॉर्डन, सीरिया, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती हे अरब राष्ट्रे इराण ला साथ देण्यासाठी मैदानात उतरील आणि जर तसे झाले तर ती तिसऱ्या महायुद्धाची सुरुवात ठरेल म्हणूनच हा संघर्ष आणखी वाढू न देण्याची खबरदारी जगाने घ्यावी.

# शिक्षणाच्या प्रांगणातील राजकीय गणिते!




मुंबई विद्यापीठाच्या अधिसभेतील पदवीधर गटाची निवडणूक नुकतीच झाली. युवासेनेने (ठाकरे गट) दहाही जागांवरील आपले वर्चस्व निर्विवाद राखले. अनेक चढउतारांनंतर झालेल्या या निवडणुकीत युवासेनेने मिळवलेला विजय अभिनंदनास पात्र आहे, हे खरेच. मात्र, विजयाइतकेच ही निवडणूक व्हावी यासाठी युवासेनेने घेतलेले कष्ट हे अभिनंदनास अधिक पात्र आहेत, असे म्हणावे लागेल. खरेतर एकतर्फी म्हणावी अशाच या निवडणुकीत ती होऊ नये म्हणून झालेल्या प्रयत्नांमुळे युवासेनेचा विजय अधिक गाजला. मुळात विद्यापीठाच्या अधिसभेतील अवघ्या दहा जागांसाठी ही निवडणूक झाली. त्याचे मतदार होते साधारण साडेतेरा हजार आणि त्यात मतदान झाले साधारण ५५ टक्के. या सगळ्याचा विचार करता या निवडणुकीचा जीव हा महापालिकेच्या एका वॉर्डशी तुलना करावी इतकाही म्हणता येणार नाही. त्यात मुंबई विद्यापीठाच्या या अधिसभेवर गेल्या अनेक वर्षांपासून युवासेनेचे वर्चस्व आहे. त्यात त्यांच्या समोर आव्हान होते ते गेली काही वर्षे प्रयत्न करूनही मुंबई विद्यापीठात अजूनही पुरती पाळेमुळे घट्ट करू न शकलेल्या अभाविपचे आणि काही अंशी छात्र भारतीचे. त्यामुळे १०–१५ वर्षे ताकदीने अधिसभा गाजवलेल्या आणि विद्यापीठातील कानाकोपऱ्यातील राजकारणात मुरलेल्या उमेदवारांचा पराभव होता तरच नवल. मात्र तरीही निवडणूक कमालीची चर्चेची, उत्सुकतेची ठरली. एरवी विद्यापीठ वर्तुळात चर्चिली जाणारी ही निवडणूक सामान्य माणसाचे औत्सुक्य चाळवून गेली. कारण मुळात ही निवडणूक होऊच नये, यासाठी झालेले प्रयत्न. अगदी निकालाच्या दिवशीपर्यंत न्यायालयात पोहोचलेले वाद. निवडणूक लांबणीवर टाकण्याच्या प्रयत्नांमुळे युवासेनेचा (ठाकरे गट) विजयाचा उत्साह अधिक वाढवला. त्यात येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर मिळालेल्या या विजयाच्या निमित्ताने चालून आलेली शक्तिप्रदशर्नाची संधी युवासेना (ठाकरे गट) आणि त्यांचा पालक पक्ष म्हणजे शिवसेना (ठाकरे गट) यांच्यासाठी नक्कीच जमेची ठरली. या विजयाचा अर्थ निवडणुकीचा भाग असलेल्या आणि नसलेल्या सर्व पक्षांनी आपापल्या पातळीवर जाहीर केलाच आहे. मात्र, दिसणाऱ्या या चित्राच्या मागे अनेक अनुत्तरित प्रश्न दडलेले आहेत.

मुंबई विद्यापीठाच्या अधिसभेची ही निवडणूक तब्बल दोन वर्षे रखडली. ही निवडणूक होणे अपेक्षित होते, तेव्हा यातील लाभार्थी पक्षांची स्थिती वेगळी होती. शिवसेनेतील फुटीनंतर ओघाने युवासेनाही फुटली. त्यामुळे अभिसभेतील युवासेनेच्या निवडून आलेले सदस्यही विभागले. राज्यातील युती, आघाडी आणि पाठिंब्यांची गणिते बदलली. त्यानंतर न्यायालयाचे निकाल आणि बऱ्याच सव्यापसव्यानंतर निवडणूक जाहीर झाली. त्या वेळी युवासेना ठाकरे गट, युवासेना शिंदे गट, अभाविप, मनसे असे सर्वच या निवडणुकीत उतरले होते. ही निवडणूक जाहीर झाली होती. विधान परिषदेच्या पदवीधर गटाच्या निवडणुकीच्या आगे–मागे. त्यामुळे सर्वच पक्षांची चाचपणी सुरू होती. त्या वेळी झालेली मतदार नोंदणी ही पन्नास हजारांपेक्षाही अधिक होती. त्या मतदार यादीवर आक्षेप घेण्यात आले आणि ती निवडणूक पुढे ढकलण्यात आली. त्या वेळी निवडणूक स्थगित करण्यात आली म्हणून झालेल्या आंदोलनात अमित ठाकरे हेदेखील आघाडीवर होते. त्यानंतर मतदारांची फेरनोंदणी झाली. सर्वच प्रक्रिया नव्याने करण्यात आली आणि आताची निवडणूक झाली. मात्र काहीच महिन्यांपूर्वी या निवडणुकीबाबत असलेला पक्षांच्या संघटनांमधील उत्साह या वेळी पुरता आटला होता. त्यामुळे अपेक्षित चौरंगी लढत न होता. अगदी महाविद्यालयांतही पाळेमुळे रोवलेली युवासेना (ठाकरे गट) आणि मुंबई विद्यापीठाच्या राजकारणात चाचपडणारी अभाविप एवढेच निवडणुकीत उरले. त्यामुळे विजय आणि पराभव अशा कोणत्याच पातळीवर मोजावी अशी राहिली नाही.

**कालौघात घटलेली लोकप्रियता...**

सार्वजनिक विद्यापीठांतील निवडणुकांनी एकेकाळी राज्य गाजवले आहे. अजूनही दिल्लीतील विद्यापीठांमधील निवडणुका या पुढील राजकीय नांदीचे सूर आळवतात. राज्यात मात्र विद्यापीठातील निवडणुकांचा उत्साह कमी होत गेला आहे. विद्यार्थ्यांच्या निवडणुकांमध्ये १९८९ साली अघटित घटना घडली. एका विद्यार्थ्याचा खून झाला आणि त्यानंतर १९९४ साली विद्यार्थी निवडणुकांवर बंदी आली. त्यामुळे विद्यापीठाच्या क्षेत्रातील निवडणुकांचे एक मोठे पर्व थंडावले. या निवडणुकांनी विद्यार्थ्यांतील अनेकांचा राजकीय नेत्यांपर्यंतच्या प्रवासाची सुरुवात करून दिली होती. राज्यातील अनेक नामांकित नेते हे विद्यार्थी निवडणुकीतून सक्रिय राजकारणात आलेले आहेत. गेल्या जवळपास चार ते पाच पिढ्यांनी विद्यार्थी संघटनांच्या निवडणुका अनुभवलेल्या नाहीत. त्यामुळे अनेक विद्यार्थी संघटनाही आता पत्रकबाजी आणि लुटुपुटुची आंदोलने या पातळीवरच धडपडत असल्याचे दिसते. मुंबई एकेकाळी काँग्रेस, शिवसेना, भाजप, डाव्या संघटना सगळ्यांच्या विद्यार्थी संघटना प्राबल्याने राजकीय पाया रचत होत्या. आता या संघटनांचे प्राबल्य घटले आणि सामान्य विद्यार्थीही या निवडणुकांपासून दुरावल्याचे दिसते. त्याच वेळी खासगी विद्यापीठांची वाढलेली संख्या हेदेखील सार्वजनिक विद्यापीठांतील निवडणुकांचा रंग फिका होण्याचे आणखी एक कारण आहे.

**राजकारण आतले आणि बाहेरचे...**

अधिसभेच्या निवडणुकीतील विजय म्हणजे भविष्यातील परिवर्तनाची नांदी असे म्हणणे हे भाबडेपणाचे. मात्र तरीही विद्यापीठाच्या निर्णयप्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावण्याची आणि तरुणाईशी जोडले जाण्याची संधी म्हणून या निवडणुकीतील विजयही महत्त्वाचा. तसेच विद्यापीठाच्या कारभारावर वर्चस्व असे म्हणणेही चुकीचेच म्हणावे लागेल. विद्यापीठांचे कुलगुरू आणि त्याखालील महत्त्वाच्या पदांवरील व्यक्तींची नियुक्ती ही राजकीय गणिते आखून होते, हे नवे नाही. अधिकाऱ्यांच्या मार्फत सत्ताधारी पक्षांची धोरणे झिरपवण्याचे प्रयत्न होतात यातही काही नवे नाही. त्यामुळे मुंबई विद्यापीठाच्या अधिसभेची निवडणूक आणि त्यात युवासेनेच्या ठाकरे गटाचा झालेला विजय हे आतील आणि बाहेरील राजकारणाचा समतोल राखण्यासाठी महत्त्वाचा ठरावा. त्याशिवाय अधिसभेतील इतर प्रतिनिधी गटांमधून असलेले डाव्या, उजव्या विचारसरणीतील पक्ष, गट आणि संघटनांचे प्रतिनिधित्व हे येत्या काळात अधिसभा गाजवणार हे स्पष्टच आहे.

## स्कंधमाता..

स्कंधमाता विराजते
नवरात पाचवीमाळ
ममत्वाचा झरा जणू
काखेत स्कंध बाळ

चतुर्भुजाजगत्जननी
गं करते स्नेह उधाळ
मनो कामना पूर्णत्वा
हसते आनंदे मधाळ

नैवेद्यात दुग्ध लोणी
मधूरफळाचा फराळ
भूकशमली भक्तीरसे
अखंड फिरतो गुराळ

सिंहारूढ अंबे समोर
नमला राक्षसअक्राळ
आईची अपार शक्ती
शरणागत कळिकाळ

ललिता पंचमी व्रतला
पुजिलेजाई लडिवाळ
पाहून स्मित लतिकेचे
झुकतेअंमळ आभाळ

दुर्वा वहा अठ्ठेचाळीस
जळले सगळे किटाळ
घारग्याचे द्यावे वायन
टळले समस्त कुटाळ

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६.**

अक्षराज
अचूक वृत्त अचूक बातमी

# देवीच्या मारक रूपाची उपासना : काळाची आवश्यकता !



नवरात्र हा खरेतर मांगल्याचा आणि पावित्र्याचा उत्सव. स्त्रीशक्तीचा जागर करण्याचा उत्सव, देवीच्या पराक्रमाची उपासना करण्याचा उत्सव. महिषासुराशी नऊ दिवस युद्ध करून नवव्या रात्री देवीने महिषासुराचा वध केला. या युद्धाचे प्रतीक म्हणून टिपऱ्या म्हणजेच दांडिया खेळल्या जातात.

आजमितीला मात्र या उत्सवाला आलेले ग्लॅमरस स्वरूप उत्सवाच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला जात आहे. चांगले नृत्य करता यावे म्हणून तरुणींसह तरुणही एक महिना अगोदरपासून नृत्याचे क्लासेस घेऊ लागले आहेत. पाठ उघडी ठेऊन त्यावर रंगरंगोटी करण्याचे किळसवाणे फॅड गेल्या काही वर्षांपासून तरुणींमध्ये शिरले आहे. नऊ दिवस नऊ रंगांचे कपडे परिधान करणे, कपड्यांसह त्यांना मॅचिंग आभूषने परिधान करणे, साजेसा मेकअप करणे, गरबा नृत्य करताना अथवा दांडिया खेळताना इतरांपेक्षा वेगळे दिसण्याचा प्रयत्न करणे याकडेच महिलांचा अधिक कल दिसून येतो. एका राक्षसी प्रवृत्तीवर प्रकट स्त्रीशक्तीने युद्ध करून मिळवलेला विजय म्हणजे नवरात्रीचा उत्सव. या नऊ दिवसांत देवीने युद्ध करून क्षात्रतेजाच्या उपासनेचे महत्व पटवून दिले. स्त्री ही अबला नसून प्रसंगी अन्याय अत्याचाराचा कर्दनकाळ ठरू शकते हे देवीने स्वतः युद्ध करून दाखवून दिले. आज आपण नवरात्रीच्या काळात दांडिया किंवा टिपऱ्या खेळतो, हा खेळ नसून ते युद्धाचे प्रतीकात्मक स्वरूप आहे हेही आज अनेकांना माहित नाही.

आजमितीला स्त्रियांवरील अत्याचाराच्या घटना कमालीच्या वाढल्या आहेत. ३ वर्षाच्या बालिकेपासून वयोवृद्धाही आज सुरक्षित नाहीत. बदलापूर पाठोपाठ पुण्यातील घटनेने साऱ्या राज्याला हादरवून सोडले. दुसरीकडे लव्ह जिहादरूपी राक्षस हिंदू स्त्रियांना विविध आमिषे आणि प्रलोभने दाखवून त्यांना प्रेमाच्या जाळ्यात ओढून हिंदूंचा वंशविच्छेद करू लागला आहे. राजकीय मंडळींना स्त्रियांच्या सुरक्षेपेक्षा राज्यात आपली सत्ता आणणे अधिक महत्वाचे वाटत असल्याने स्त्री सुरक्षेच्या दृष्टीने ठोस पावले उचललीच जात नाहीत. अशा वेळी स्त्रियांनीच आपल्या सुरक्षेसाठी सज्ज झाले पाहिजे. समाजाची ढासळलेली नीतिमत्ता पाहता प्रतिकूल प्रसंगांना सामोरे जाण्याची वेळ स्त्रियांवर कधीही येऊ शकते यासाठी प्रत्येक स्त्रीने आपले शरीर आणि मन प्रतिकारक्षम ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. त्याकरिता स्त्रियांनी स्वरक्षणाचे प्रशिक्षण घेणे आज अत्यंत गरजेचे बनले आहे.

कराटे, लाठीकाठी यांसह आपल्या दैनंदिन वापरातील वस्तूंच्या आधारे स्वतःचे रक्षण कसे करावे, प्रवासात स्वरक्षणासाठी कोणती साधने स्वतः सोबत बाळगावीत यांचे विनामूल्य प्रशिक्षण देणाऱ्या संस्था आणि संघटना आज गावोगावी आहेत. त्यांचा लाभ करून स्वतःतील आत्मबल वाढवूया. जेव्हा कधी आपल्यावर प्रतिकूल प्रसंग येईल तेव्हा आपले नातेवाईक, मित्र मंडळी, पोलीस, राजकीय मंडळी आपले रक्षण करण्यास वेळेत पोहोचतील याची शाश्वती नाही अशा वेळी समोरच्याशी दोन हात करून त्याला धडा शिकवायचा असेल तर तेव्हढी शारीरिक आणि मानसिक क्षमता आपल्यामध्ये असणे आज आवश्यक आहे. आपल्यासोबत आपल्या परिसरातील, कार्यालयातील स्त्रियांना सबला बनवण्याचे दायित्व आज स्त्रियांनीच घेण्याची वेळ आली आहे.

स्त्रियांना कायद्याचेही संरक्षण असल्याने समाजातील वासनांध प्रवृत्तीचा नायनाट करण्यासाठी स्त्रियांनीच पुढे यायला हवे. आजच्या स्त्रियांसमोर आदर्श हवा आहे तो रणरागिणी झाशीच्या राणीचा, राजमाता जिजाबाईंचा, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकरांचा. राणी चेन्नमांचा. स्त्रीशक्तीचा या प्रकट रूपाची उपासना करण्याची वेळ आता आली आहे. त्यामुळे या नवरात्रीला नवरात्री उत्सवामागील भावार्थ समजून घेऊन दुर्गादेवीच्या मारक रूपाची उपासना करण्याचा संकल्प करा !

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात


## गुहागर आगाराला नवीन गाड्या द्या ! जुन्या गाड्या दिल्या तर होणार विरोध



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.०६, गुहागर :** गुहागर आगारात तीन शिवशाही बस देण्यात येणार आहेत, मात्र त्या शिवशाही बस जुन्या देण्यात येणार असल्याने, जर गुहागर आगाराला जुन्या शिवशाही गाड्या देण्यात आल्या तर गुहागर तालुका प्रवाशी संघटना त्याला तीव्र विरोध करेल असा इशारा संघटना अध्यक्ष पराग कांबळे यांनी एसटी प्रशासनाला दिला आहे. गुहागर आगारात लालपरी गाड्या कमी असल्याने मोठी समस्या निर्माण झाली आहे. गुहागर आगारात एकूण २९ लालपरी आहेत, त्या नवीन मिळाव्यात, जुन्या शिवशाही गाड्या गुहागर प्रवाशी जनतेच्या माथी मारण्यात येत असतील तर गुहागर आगाराचे नुकसान आहे. संबंधित अधिकारी यांनी याकडे जातीने लक्ष घालावे अशी मागणी गुहागर तालुका प्रवाशी संघटनेचे वतीने करण्यात येते. गुहागर आगारातील आवक देणाऱ्या गाड्या जाणूनबुजून बंद करण्यात आल्याचे कांबळे यांनी सांगत त्याचबरोबर ग्रामीण भागात गाड्या उपलब्ध नसल्याने प्रवाशी वर्गाचे व शालेय विद्यार्थी यांचे खूप मोठे नुकसान व ससेहोलपट होत आहे. गुहागर आगाराच्या माथ्यावर जुन्या गाड्या मारू नयेत असा इशारा गुहागर तालुका प्रवाशी संघटनेने दिला आहे.

## बळीराज सेनेकडून पराग कांबळे की शरद बोबले गुहागर मध्ये उत्सुकता शिगेला...





**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.०६, गुहागर :** गुहागर विधानसभा मतदार संघात बळीराज सेनेकडून पराग कांबळे की शरद बोबले याबाबत उत्सुकता वाढली आहे. गुहागर विधानसभा मतदार संघात यावेळी मोठी चुरस आहे, यावेळी अनेक नवे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे साहजिकच गुहागर मतदार संघात प्रस्थापित राजकीय पक्षाना मोठी कसरत करावी लागणार आहे. बहुजन समाज यावेळी मोठया संख्येने बळीराजसेने सोबत आहे.

## बारड येथे पालक मेळावा २०२४ उत्साहात साजरा




**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०५, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यातील बारड येथील स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ बारडद्वारा संचलित स्वातंत्र्य सेनानी राजारामबापू माध्यमिक शाळा बारड, श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय बारड व शंकरराव देशमुख इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज बारड द्वारा ५ ऑक्टोबर २०२४ रोजी पालक मेळावा साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे अध्यक्ष संजय रावजी शंकररावजी देशमुख व संचालक मंडळ यांच्या हस्ते माता सरस्वती व शीतला मातेच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलनाने करण्यात आले.

या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे डॉक्टर संजय कळमकर प्रसिद्ध साहित्यिक व व्याख्याते) यांनी या पालक मेळाव्यात विद्यार्थी विकासात पालकांची भूमिका यावर त्यांनी चालू स्थितीवर चुरचुरीत भाष्य करताना पालकांना वास्तवाची जाणीव करून दिली त्याचबरोबर त्यांनी व्याख्यानात विविध दाखले देत तिरकसपणा, उप हास, विडंबनाची सहज सुंदर पखरण केली व श्रोत्यांना मंत्रमुग्ध व अंतर्मुख केले. त्याचबरोबर पालक मेळाव्यात आदर्श पालक यांना व्यासपीठावर मानाचे स्थान देण्यात आले व त्यांचा सत्कार करण्यात आला .पालक मेळाव्यात माजी विद्यार्थी जे शासकीय सेवेत विविध पदावर नियुक्त झाले त्या विद्यार्थ्याचे शाल श्रीफळ व विठ्ठल रुक्मिणी देवीची प्रतिमा देऊन संस्थेचे अध्यक्ष संजय रावजी शंकररावजी देशमुख साहेब व संचालक मंडळांनी त्यांचे स्वागत व सत्कार केले त्याचबरोबर सेवानिवृत्त शिक्षक अधिकारी यांचेही सत्कार अध्यक्ष व संचालक मंडळाकडून करण्यात आला. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे विद्यार्थी पालक शिक्षक यांच्यात मेळ घालून एक सुसंस्कृत आदर्श पिढी घडावी हाच उद्देश होता. या पालक मेळाव्यात खूप मोठ्या प्रमाणात पालकांची उपस्थिती होती. या कार्यक्रम प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष संजयराव शंकररावजी देशमुख, उपाध्यक्ष रमेशचंद्र महाजन, सचिव रामेश्वर कोरबनवाढ, सहसचिव अशोक गव्हाणे व संचालक मंडळ उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉक्टर पंजाबराव शिंदे व आभार प्राध्यापक गोकुळ चव्हाण यांनी मानले. या कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक रामकिशन चुबेवर, कॉलेजची प्राचार्य हेमंत इंगळे व शंकराव देशमुख इंग्लिश स्कूलचे प्राचार्य सचिन गव्हाणे त्याचबरोबर शाळा महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# माढा तालुक्यातील बावी येथे ओपन बैलगाडा शर्यतीचा उडाला धुरळा




**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०६, पंढरपूर :** माढा विधानसभा मतदारसंघात विठ्ठल साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी सामाजिक कार्यक्रमांच्या धडाका लावला आहे. शनिवारी बावी येथे ओपन बैलगाडा शर्यतीच्या मैदानाने मोठी धमाल केली. सुमारे दहा हजार बैलगाडा शर्यत शौकिनांनी या कार्यक्रमास हजेरी लावल्याचे दिसून आले. बैलगाडा शर्यतीतील बैलांनी अक्षरशः धुरळा उडवून दिला.

यावेळी अभिजीत पाटील यांनी नागरिकांनी पाठीशी उभे राहिल्यास या मतदारसंघात विकास कामांचा धुरळा उडवून देऊ. आजपर्यंत स्पर्धकच शर्यतीत उतरला नव्हता. आता जशास तसे उत्तर देणारा स्पर्धक मैदानात उतरला आहे अशी बोचक टिका केली आहे.

सोलापूर जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीसाठी माढा मतदारसंघ चर्चेत आला आहे. विठ्ठल कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी या मतदारसंघात पाय रोवल्याने, कार्यक्रमांचा धडाका उडवून दिल्याने, या मतदार संघातील लढत मोठी चुरशीची होण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. आ. बबनदादा शिंदे हे महायुतीत असताना, त्यांनी राष्ट्रवादीप्रमुख शरद पवार यांच्याशी संधान बांधणे सुरू केले आहे. एवढ्यावरच न थांबता, शरद पवार यांनी उमेदवारी न दिल्यास अपक्ष निवडणूक लढवण्याची घोषणाही केली आहे.

विठ्ठल साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी मागील काही महिन्यांपासून, माढा तालुक्यात तळ ठोकला आहे. माढा केसरी कुस्ती स्पर्धा, माढा केसरी बैलगाडा शर्यत, महिलांसाठी खेळ मांडियेला यासारख्या विविध कार्यक्रमांचा धडाका उठवला आहे. शेतकऱ्यांना ऊसचा दर वाढवून देण्यात अभिजीत पाटील यांचाच मोठा वाटा असल्याची चर्चा शेतकरी वर्गातून होऊ लागली आहे.

> माढा तालुक्यातील विधानसभा निवडणुकीमुळे वातावरण पुरते ढवळले आहे. विठ्ठल कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी या निवडणुकीत रस दाखविल्यामुळे, दोन्ही साखर सम्राट एकमेकांविरोधात उभे राहत असल्यामुळे, या मतदार संघातील लढतीकडे सबंध जिल्ह्याचे लक्ष लागून राहिले आहे.

माढा केसरी २०२४ बैलगाडा शर्यतीने त्यांनी शेतकरी वर्गाची मने जिंकण्याचा प्रयत्न केला आहे. बावी येथे भरवण्यात आलेल्या बैलगाडा शर्यतीच्या समारोपप्रसंगी त्यांनी नागरिकांना संबोधित केले. शेतकऱ्याचा मुलगा चेअरमन झाल्यावर काय फायदा होतो, हे शेतकऱ्यांना कळले आहे. चेअरमनचा मुलगा चेअरमन झाल्यास कारखान्याची कशी वाट लागते, हेही शेतकऱ्यांनी पहिले आहे. आता शेतकऱ्यांच्या मुलाला आमदार करण्याची संधी नागरिकांना आली आहे. नागरिकांनी संधी दिल्यास माढा तालुक्याचा सर्वांगिणक विकास करून दाखवणार असल्याचे सांगितले. या तालुक्यात विकासाचा धुराळा उडवून देऊ, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी प्रथम क्रमांक नाथसाहेब प्रसन्न मोहेल शेठ धुमाळ व पै.तेजस भैय्या पाटील व दुसरा क्रमांक सेवागिरी प्रसन्न सोहम जगदीश बापू शिंदे उरळी तर तिसरा क्रमांक पै.विराज नानासाहेब पिसे पठारवाडी शिरवळ, चौथा क्रमांक बडेबाबा प्रसन्न शिवांश तुषार घोरपडे सरकार पनवेल तसेच पाचवा क्रमांक अतुल नाना सुर्वे मोडनिंब भारत प्रेमी तर सहावा क्रमांक सरपंच रामभाऊ पांढरे शिर्डी संभाजी गीते पिंपरीकर तर सातवा क्रमांक मॉ तुळजा भवानी प्रसन्न सर्वज्ञा अमोल दादा गायकवाड वडकी यांनी विजय खूचून आणत गुलालाची उधळण करत रोख पारितोषिक मिळवली.

## भक्तांना उपचारासाठी घेऊन जाणाऱ्या ॲम्बुलन्सला अस्तव्यस्त गाड्यामुळे अडथळा निर्माण



**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.०६, तुळजापूर (धाराशिव) :** तुळजापूर तिर्थक्षेत्र येथे सध्या शारदीय नवरात्र महोत्सव चालू असून सध्या लाखो भाविक आईच्या दर्शनासाठी तुळजापूर शहरामध्ये दररोज दाखल होत आहेत.भवानी रोड,लोखंडी गेट जवळ मंदिर संस्थांनी बीव्हीजी कंपनीचे सिक्युरिटी गार्ड व त्यांची चौकी प्रस्थापित असून देखील गेटच्या पुढे मोठ्या प्रमाणात फोर व्हीलर लावल्यामुळे तुळजाभवानी मंदिराकडून सिरीयस भक्तांना घेऊन जाणारी दि.०६ रोजी ॲम्बुलन्स ला उपचारासाठी घेऊन जाणाऱ्या सिरीयस भक्ताला अडथळा निर्माण झाला तो केवळ तेथे नेमणूक केलेल्या बीव्हीजी कंपनीच्या सेक्युरिटी यांनी कामात कसूर व हलगर्जीपणा केल्यामुळे मुळे मग हे सिक्युरिटी काय फक्त पगार उचलून झोपा काढतात का ?

यांच्या या हलगर्जीपणामुळे एखादा पेशंट दगावण्याची शक्यता नाकारता येत नाही झालेल्या प्रकाराची श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी यांनी गांभीर्याने दखल घेऊन कामात कसूर व दिरंगाई करणाऱ्या येथे ड्युटीवर असणाऱ्या सेक्युरिटी वर कार्यवाही करावी अशी मागणी नागरिकातून व भाविकातून केली जात आहे व कर्तव्यदक्ष सेक्युरिटी येथे नेमावेत अशी मागणी शहरातील नागरीकातून व भाविकातून केली जात आहे.

## कवी आनंद भारमल यांना महाराष्ट्र साहित्य भूषण पुरस्काराने सन्मानित



**अक्षराज : दशरथ राऊत**

**दि.५, खंडाळा :** खंडाळा येथील सुप्रसिध्द विद्रोही कवी पत्रकार आनंद भारमल यांना कला, पर्यटन व सांस्कृतिक महोत्सव समिती, महाराष्ट्र आणि मोकळा श्वास सामाजिक संस्था, सातारा यांच्या कडून दिला जाणारा 'महाराष्ट्र साहित्य भूषण पुरस्कार -२०२४' कराड येथे झालेल्या राष्ट्रीय एकता सामाजिक लोक गौरव परिषद कराड-सातारा संमेलनात मोठ्या सन्मानाने प्रदान करण्यात आला. सदर पुरस्कार त्यांनी साहित्य क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय दर्जेदार साहित्य कृती बद्दल सुप्रसिद्ध जेष्ठ अभिनेते सुनिल गोडबोले यांच्या हस्ते व सावली प्रकाशनचे सर्वेसर्वा खरात सर, मोकळा श्वास च्या अध्यक्षा सपना भोसले व अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत देण्यात आला.

कवी आनंद भारमल हे पोटापाण्यासाठी सुतार काम(फर्निचर) करतात व छंद म्हणून लेखन अगदी शालेय जीवनापासून करतात.त्यांच्या कविता सामाजिक विषमता, शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची विदारक कहाणी, महिलांचे शोषण, अंधश्रद्धा यावर अतिशय परखड भाष्य करतात. त्यांच्या हजारो कविता, चारोळ्या, कथा फेसबुक व युट्यूबवर प्रसिद्ध आहेत. पुरस्कार विषयी बोलताना ते म्हणतात, जी सामाजिक विषमतेची छळ मी सोसतो त्यातून माझी कविता जन्म घेते व निखाऱ्यासारखी फूलत जाते. हा माझा नव्हे तर माय मराठीचा, माझ्या रसिक जनांचा सन्मान मी समजतो.

## चेअरमन अभिजीत पाटील यांचे वतीने आयोजित 'हटके ईव्हेन्ट' ची ग्रामीण भागात चर्चा



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.६, पंढरपूर :** कोरोना काळात केलेल्या सामाजिक कार्याची दखल घेत 'ऑक्सिजन मॅन' अशी झालेली ओळख, बंद पडलेले कारखाने चालू करणारा 'डॉक्टर' ऊस उत्पादक शेतकर्यांना जिल्ह्यात सर्वाधिक दराचा 'धपका' देणारा चेअरमन म्हणून ओळख असलेले अभिजीत पाटील पुन्हा एकदा 'हटके ईव्हेन्ट' आयोजित करुन चर्चेत आले आहेत.

सध्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्ह्यातील ईच्छुक उमेदवार आप आपल्या मतदारसंघात विविध उपक्रम राबवुन मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करीत आहेत. यातच विठ्ठल सह.साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील हेसुद्धा माढा विधानसभा मतदारसंघातून प्रस्थापितांचे विरोधात जोरदार मोर्चेबांधणी करताना दिसत आहेत. प्रत्येक वेळी विविध सामाजिक उपक्रमांना ते आयोजित करीत असलेल्या हटके ईव्हेन्ट ची चर्चा मतदारसंघात जोरदार सुरू असते. कोरोना काळात त्यांनी राज्यात पहिला ऑक्सिजन प्रकल्प उभारल्याने त्यांची ओळख ऑक्सिजन मॅन अशीही झाली. तसेच वेगवेगळ्या जिल्ह्यातील खाजगी साखर कारखाने घेत ते उत्तम प्रकारे चालविल्याने बंद असणारे कारखाने चालविणारा 'डॉक्टर' असेही त्यांना संबोधण्यात आले.

यातच आत्ता विधानसभेच्या तयारीला ईच्छुक असतानाच अभिजीत पाटील हेही मतदारसंघात वेगवेगळ्या उपक्रमाचे आयोजन करीत आहेत. त्यांचे हे उपक्रम मागील तीन वर्षांपासून सुरू असुन यामध्ये त्यांनी तडाखेबंद महानाट्य रायबा, अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त व्याख्याते संजय आवटे यांचे वैचारिक व्याख्यान, दहावी बारावी विद्यार्थांसाठी विठ्ठल कांबळे सरांचे घे भरारी मार्गदर्शन शिबीर, विठ्ठल मुर्ती संरक्षण महोत्सव आयोजित भव्य किर्तन सोहळा, कुस्ती प्रेमींसाठी माढा केसरी मैदान, भव्य बैलगाडा शर्यतीचे मैदान यासह विविध ठिकाणी महिलांसाठी खेळ पैठणीच्या माध्यमातून गप्पा, गाणी, प्रश्नमंजुषा कार्यक्रम घेऊन चांगलेच चर्चेत आहेत. विविध सामाजिक उपक्रम राबवित असताना अभिजीत पाटील हे हटके कार्यक्रमाचे नियोजन करीत असल्याने त्यांच्या या 'हटके ईव्हेन्ट' ची जोरदार चर्चा होताना दिसत आहे.

## सरकारने खंडाळा तालुक्यावर अन्याय करू नये : डॉ.विजय शिंदे



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.६, खंडाळा (सातारा) :** नुकतेच खंडाळा तहसीलदार अजित पाटील यांना खंडाळा तालुका विकास प्रतिष्ठानचे वतीने निवेदन देण्यात आले. यामध्ये निरा-देवधर प्रकल्पाला शासनाने २५/०९/१९८४ रोजी मूळ मान्यता दिली होती.त्याला ४० वर्षे होऊन गेली असून या प्रकल्पात पाणी संचय झालेल्याला बराचसा कालावधी झालेला आहे. परंतु आज पर्यंत खंडाळा तालुक्यातील बहुसंख्य ७० ते ८० टक्के लाभक्षेत्राला हे शेती पाणी आजपर्यंत मिळू शकले नाही. अलीकडच्या काळात खंडाळा तालुक्याला डावलून कालव्याच्या पुढील फलटण तालुक्यातील कामासाठी निधी देऊन ही कामे शासनाने सुरू केली आहेत. हा खंडाळा तालुक्यावरील अन्याय आहे, हा अन्याय खंडाळा तालुक्यावर करू नये असे डॉ.विजय शिंदे यावेळी म्हणाले. खंडाळा तालुका विकास प्रतिष्ठानने वेळोवेळी यासाठी संघर्ष केला आहे. त्यामुळेच आत्तापर्यंतची काही कामे मार्गी लागले आहेत. परंतु खंडाळा तालुक्यासाठी वरदान ठरणाऱ्या या प्रकल्पाच्या वाघोशी, शेखमिरवाडी व गावडेवाडी या उपसा जलसिंचन योजना शासनाची उदासिनता व वेळकाढुपणामुळे तसेच निधीअभावी रखडलेल्या आहेत. तरी यासाठी शासनाने त्वरित निधी उपलब्ध करून द्यावा व या उपसा जलसिंचन योजनांची कामे त्वरित सूरू करावीत व खंडाळा तालुक्यावरील अन्याय दुर करावा अन्यथा यासाठी शेतकऱ्यांच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल व यासाठी सर्वस्वी शासन जबाबदार राहील. असे सदर निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

हे निवेदन देण्यासाठी प्रतिष्ठानचे सचिव डॉ.विजय शिंदे पाणी पंचायतीचे अध्यक्ष एस.वाय.पवार तानाजीराव धायगुडे, कांतीलाल यादव, भगतसिंग पवार, मंगेश शेडगे, संतोष रामगुडे व शेतकरी उपस्थित होते.

# उमरेड येथे आरक्षण बचाव जनसंवाद यात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, भिवापूर :** वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय नेते प्रकाश आंबेडकर यांच्या आदेशानुसार संपूर्ण विदर्भात आरक्षण बचाव जनसंवाद यात्रा काढण्यात आली.

जयभीमचे जनक बाबु हरदास एल.एम.एन. यांचे नातू प्रशांतजी नगरकर यांच्या नेतृत्वामध्ये उमरेड विधानसभा क्षेत्रातील उमरेड भिवापूर आणि कुही या तिन्ही तालुक्यात आरक्षण बचाव जनसंवाद यात्र काढण्यात आली होती. उमरेड विधानसभेत सामाजिक कार्यकर्त्या इंजि सपना राजेंद्र मेश्राम व सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र उर्फ राजुभाऊ यांच्या यांनी या यात्रेचे आयोजन केले होते. विधानसभेतील उमरेड, भिवापूर आणि कुही या तिन्ही तालुक्यातील आरक्षण बचाव जनसंवाद यात्रा काढण्यात आली. या यात्रेची सुरुवात उमरेड तालुक्यातील



पाचगाव येथील बौद्ध विहारातून या यात्रेला सुरुवात करण्यात आली.

अनुसूचित जाती जमातीचे वर्गीकरण व क्रिमिलेअर न लावण्या संदर्भात संसदेत कायदा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय त्वरित रद्द करावा, सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामुळे अनुसूचित जातीच्या राखीव जागेवर नियुक्त झालेले परंतु जात वैधता प्रमाणपत्र सादर न करू शकलेले १,२५,००० पदे रिक्त झाले असून ते तात्काळ भरण्यात यावे, महिला सुरक्षा, शिक्षण व्यवस्था आणि रोजगार निर्मिती व जुनी पेन्शन योजना यावर सरकारने लवकरात लवकर खुलासा करावा. या विषयाला अनुसरून ही आरक्षण बचाव जनसंवाद यात्रा काढण्यात आली होती.

आरक्षण बचाव जनसंवाद यात्रेचा शेवट कुही शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ झाला.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र मेश्राम, राजु गायकवाड, जोगेंद्र मेश्राम, मिलिंद लोखंडे, सुरज खेडकर, किशोर घरत, चंद्रमणी शेंडे, मंगेश शेंडे, विश्वनाथ डेकाटे, संदेश मेश्राम, जितेंद्र सवाईकर, संदीप गोळघाटे, रजत लिंगायत, मुकेश बहादुरे, अशोक वंजारी, रमेश घुटके, रमेश ऊके, हिमांशू बहादुरे, अशोक रामटेके,सोनु कुर्वे, उत्तम मेश्राम, सुरेश पाटील, अशोक रामटेके, सिलवान गजभिये, सुधाकर बडगे,इज्जु शेख, अल्ताफ अवसरे, दिपक ऊके, सरीता गौतम कांबळे, कुंदा घरत, लक्ष्मी पिल्लेवान, प्रतिभा पाटील, दुर्गा हाडके, अर्चना बहादुरे, छाया पिल्लेवान, चंद्रकला सुखदेवे, निर्मला सातपुते, संगीता सुखदेवे, संगीता शंभरकर, लता शंभरकर, सीमाताई हाडके नागपूर जिल्हा तसेच उमरेड विधानसभा क्षेत्रातील वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उमेद महिला व कर्मचारी संघटनेच्या मागण्या व अधिवेशनास मान्यवरांचा पाठिंबा

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.६, खंडाळा (सातारा) :** उमेद महिला व कर्मचारी कल्याणकारी संघटना (वाई खंडाळा महाबळेश्वर केडर व स्टाफ)यांचे वतीने आयोजित केलेले तालुकास्तरीय जन जागृती अधिवेशन मातोश्री मंगल कार्यालय भुईंज ता.वाई येथे संपन्न झाले.

सदर अधिवेशनादरम्यान वाई विधानसभा मतदार संघाचे आमदार मकरंद आबा पाटील यांनी भेट देऊन संघटनेच्या रास्त मागण्या मंजूर होण्याच्या अनुषंगाने मुख्यमंत्री,दोन्ही उपमुख्यमंत्री व ग्रामविकास मंत्री यांच्याकडे लेखी स्वरूपात जाहीर पाठिंबा दिला.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे जन्मगाव नायगाव ता खंडाळा जि सातारा



येथे आमदार योगेश टिळेकर विधान परिषद सदस्य हे भेट देण्यासाठी आले असता त्यांना देखील उमेद महिला व कर्मचारी कल्याणकारी संघटनेचे खंडाळा तालुका पदाधिकारी यांच्या मार्फत निवेदन देऊन संघटनेच्या रास्त मागण्यांबाबत त्यांचा पाठिंबा घेण्यात आला.

तसेच सदर अधिवेशनाला पाठिंबा देण्यासाठी विधानसभा मतदारसंघातील अनेक मान्यवर लोकप्रतिनिधी यांनी भेटी देऊन पाठिंबा जाहीर केला असून त्यामध्ये गजानन प्रतापराव भोसले भाजप नेते वाई विधानसभा,डॉ.नितीन सावंत नेते शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी वाई विधानसभा,दिलीप बाबर माजी जिल्हा परिषद सदस्य, प्रमोद दादा शिंदे माजी सभापती पंचायत समिती वाई,अनिल आबा जगताप माजी उपसभापती पंचायत समिती वाई, शशिकांत पवार माजी जिल्हा परिषद सदस्य,रामचंद्र फरांदे माजी पंचायत समिती सदस्य वाई,जयदीप शिंदे तालुकाध्यक्ष युवक काँग्रेस वाई,विलास पिसाळ वाई तालुका अध्यक्ष काँग्रेस सेवादल विविध गावचे सरपंच आदी मान्यवरांनी अधिवेशनात भेटी देऊन लेखी स्वरूपात पाठिंबा जाहीर केला या वेळी वाई खंडाळा महाबळेश्वर या तीनही तालुक्यातील केडर व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# परिवर्तन महाशक्ती आघाडीच्या पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.६, निफाड (नाशिक) :** विधानसभा निवडणुकीच्या आधी राज्यात तिसऱ्या आघाडीची घोषणा झाली. या निफाड येथे परिवर्तन महाशक्ती जिल्ह्यातील सर्व पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न झाली.

निफाड येथे रुद्राय हॉटेल येथे परिवर्तन महाशक्ती आघाडीची बैठक संपन्न झाली. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकारणामध्ये नवीन सक्षम पर्याय देण्याची घोषणा छत्रपती संभाजी राजे, बच्चू कडू, शंकर तोडगे, यांनी परिवर्तन महाशक्ती आघाडी स्थापन केली. निफाड येथे परिवर्तन



महाशक्ती पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न झाली.

या बैठकीमध्ये गुरुदेव कांदे हे निफाड मतदार संघातून आमदारकी लढणार असा निर्णय या बैठकीमध्ये घेण्यात आला. त्यामुळे निफाडचे राजकारणाचे चित्र बदलणार हे नक्की. आत्ताचे राष्ट्रवादी काँग्रेस आमदार दिलीप बनकर (अजित पवार गट), शिवसेना (उबाठा) अनिल कदम, भाजप यतिन कदम, परिवर्तन महाशक्ती आघाडीचे गुरुदेव कांदे यांच्या चौरंगी लढत मधी कोण बाजी मारणार याकडे सर्वांचे लक्ष लागून आहेत. यात निफाडकर कोणाला पसंती देणार हे लवकरच कळेल. यावेळी केशव गोसावी, स्वराज्य संघटना उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष, ज्ञानेश्वर थोरात उत्तर महाराष्ट्र सचिव उमेश शिंदे, सुधाकर मोगल संपर्कप्रमुख, दत्तू बोडके, निवृत्ती गारेपाटील, बाळासाहेब धुमाळ, शरद शिंदे, जगन काकडे, अमजद पठाण, समाधान बागल, संध्या जाधव, जयेश जगताप, सोमनाथ धुमाळ, अर्जुन बोराडे, शाम गोसावी, शंकरराव ढिकले, अशोक अहिरे, संजय पाटोळे, संदीप क्षीरसागर तसेच नाशिक जिल्ह्यातील मोठ्या संख्येने पदाधिकारी होते.

# लायन्स क्लब ऑफ खोपोलीच्या वतीने आरोग्य चिकित्सा शिबिर

**अक्षराज : मानसी कांबळे**

**दि.६, खोपोली :** दैनंदिन धावपळीत आपल्या आरोग्याकडे लक्ष देण्यासाठी जनसामान्यांना वेळ नसतो, सगळ्याच आरोग्य चिकित्सा एका ठिकाणी होत नाहीत आणि यासाठी मोठ्या प्रमाणात पैसै खर्च करावे लागतात या बाबींचा अभ्यास करून लायन्स क्लब ऑफ खोपोलीच्या वतीने डॉ. रामहरी धोटे सभागृह खोपोली येथील लायन सर्विस सेंटरमध्ये भव्य आरोग्य चिकित्सा शिबिराचे आयोजन केले होते.

कॅन्सर पेशंट एड असोसियेशनच्या श्रीमती अनिता पीटर यांच्या मार्गदर्शनाखाली तज्ज्ञ डॉक्टरांच्या माध्यमातून साधारणता २२७ जणांची मोफत आरोग्य चिकित्सा केली गेली.

या शिबिरात नाक, घसा तज्ज्ञ आणि स्त्री रोग तज्ज्ञांकडून शिबिरार्थींची तपासणी केली गेली. इसीजी टेस्ट, ब्लड टेस्ट सोबत स्त्रियांसाठी स्तनाच्या कॅन्सर, पुरुषांसाठी तंबाखु मुळे होणाऱ्या कॅन्सरची टेस्ट केली गेली आणि आरोग्य विषयक सल्लाही देण्यात आला. जर या शिबिरातून कोणास एखादा आजार निष्पन्न झाल्यास त्याचा मोफत इलाज केला जाणार असल्याची माहिती लायन्स क्लब ऑफ खोपोलीचे अध्यक्ष दिपेंद्र बदोरिया यांनी दिली.

या संपूर्ण शिबिराची तांत्रिक जबाबदारी सारीका शाह यांनी घेतली होती तर जिनय शाह यांनी समन्वयकाची भूमिका बजावली होती. शैली मेहता, चेतना केजरीवाल यांच्यासह लायन्स क्लबच्या सर्वच सदस्यांनी आपला सहभाग नोंदविला होता. अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने या शिबिराचे आयोजन केले गेले होते. बुज हास्य क्लब, अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्था आदी संस्थानी देखील मोलाचे सहकार्य केले.

# थोडक्यात

## जुईनगरला भव्य धम्म रॅली संपन्न...



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, जुईनगर (नवी मुंबई) :** सालाबादप्रमाणे बौद्धजन पंचायत समिती शाखा क्र ८२८ व संघमित्रा महिला मंडळ जुईनगर यांच्या विध्यमाने शनिवार दि.५ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १० वाजता भव्य धम्म रॅली संपन्न झाली.

नवरात्री उत्सव चौकातून रॅलीला प्रारंभ झाला संपूर्ण जुईनगर प्रभागातून बुद्धम सरणग गच्यामी वंदना घेत उपसाक उपासीका शिस्तीने संघाबरोबर चालत होते. अतिशय मंगलमय वातावरण निर्माण करून रॅली अभिनंदन हॉल सेक्टर २ नेरुळ ठिकाणी थांबली. संघाला भोजन देऊन आशीर्वाद घेण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे विजय नाहटा, उद्योजक जालिंदर औटी, मंगेश पवार, गोपाळ जाधव आदी उपस्थित राहून आशीर्वाद घेतले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुनील शिर्के, सूर्यकांत सावंत, सिध्दार्थ साळवी, यशवंत शिंदे, समीर साळवी, शिवदास सकपाळ, बुद्धेश्वर दरेकर यांनी मेहनत घेतली. रॅलीला विभागातील तमाम उपासक उपासीका उपस्थित होते.

## झरी-मुकूटबन शहरातील मोकाट जनावरांचा बंदोबस्त करा

**अक्षराज : राजू गागरे**

**दि.६, झरी (यवतमाळ) :** झरी-मुकूटबन शहरातील काही मुख्य चौका चौकात व राज्य मार्गावर मोकाट जनावरांचा सुळसुळाट दिसून येत आहे. या मोकाट जनावरांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी राजकीय व सामाजिक कार्यकत्यांकडून होत आहे.



मोकाट जनावरे शहरातील रस्त्यावर, चौकात व रहदारीच्या ठिकाणी मोकाट जनावरे बसलेले दिसून येत आहे. या मोकाट जनावरांचा त्रास वाहतुकीला व ये-जा करणा-या नागरीकांना होत आहे. ही मोकाट जनावरे रस्त्यावर मुक्त संचार करीत असल्याने अपघाताची शक्यता बळावली आहे. त्यामुळे संबंधित प्रशासनाच्या वतीने मोकाट जनावरांचा बंदोबस्त करण्यात यावा. मोकाट जनावरांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असल्याचे निदर्शनास येत आहे. काही मोकाट जनावरे रस्त्यावर उभी राहात असल्याने अपघाताचे बळी ठरत आहे. दि५ आक्टोंबर रोजी अशाच एका मोकाट जनावराच्या उपचारासाठी मुकूटबन येथील पशु चिकित्सक वैद्यकिय डॉक्टर यांना बोलावू बजरंग दलाच्या काही सदस्यांनी उपचार केला आहे. अपघातामुळेच त्या मोकाट जनावराच्या पायावरून चाक गेल्याने दुखापत जखम झाल्याचे निदर्शनास आले आहे. सध्या त्या जनावराच्या पायाला झालेल्या जखमेवर पशु चिकित्सक डॉक्टरने औषधोपचार केला आहे. त्यांनी सांगितले आहे की, या अगोदरही अपघात झालेल्या अशाच २-३ मोकाट जनावरांचा उपचार केला गेला आहे. त्यावरून काही जनावरे मालकांच्या हलगर्जीपणा मुळेच मोकाट मुक्या जनावरांचा जीव टांगणीला लागला आहे. रहदारीच्या मार्गात मधोमध जनावरे उभे राहील्याने वाहतुकीस अडथळा ठरत आहे. एखाद्यावेळी मोठ्या अपघातामुळे रहदारी कर्त्यांची, जनावरांची जीवीतहानी होण्यापेक्षा मोकाट जनावरे मालकांनीही समस्या समजून घेऊन आपआपल्या मोकाट जनावरांचा बंदोबस्त करावा. अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## पांचगणीत भाजी मंडईला भिषण आग ; लाखोंचे नुकसान

**अक्षराज : अजय कांबळे**

**दि.५, पाचगणी (सातारा) :** शनिवार दि.५ ऑक्टोबर रोजी रात्री साधारण ११ ते १२च्या दरम्यान पाचगणीतील सावंत भाजी मार्केट येथे आग लागून ऐन सणासुदीला अनेकांची दुकाने जळून खाक झाली आहेत. आगीने येवढे रौद्र रूप धारण केले होते की, अनेकांचे संसार जळून खाक झाले. यावेळी लोकांना अश्रू अनावर झाले नाहीत.



रात्री उशिरापर्यंत अग्निशामक पांचगणी नगरपालिका, पोलिस प्रशासन, वॉटर टँकर स्पलायर, सामाजिक कार्यकर्ते यांचे मदतीने आग आटोक्यात आणली गेली. आग येवढी भयंकर होती की, आज सकाळी देखील त्याचे निखारे धुमसत होते. सदर घटनेचा पंचनामा करून नुकसान झालेल्या नागरिक व व्यापाऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई मिळावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते ननावरे यांनी केली आहे.

# गलिच्छ मनोवृत्तीच्या राजकीय लोकांना स्वच्छ करा - ॲड. सरोदे

**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि. ०६, धाराशिव :** गाडगेबाबा हे दिवस उगवण्यापूर्वी संपूर्ण गाव स्वच्छ करून बिन बोभाटपणे जात होते. मात्र आता

देशात स्वच्छ अभियान राबविण्याच्या माध्यमातून हातामध्ये झाडू धरून फोटो काढण्याची प्रवृत्ती वाढलेली आहे. त्यामुळे अशा गलिच्छ मनोवृत्तीच्या राजकीय लोकांना स्वच्छ करायला पाहिजे असे आवाहन करीत केंद्र व राज्यातील सत्ताधाऱ्यांवर विचारवंत ॲड असीम सरोदे यांनी दि.५ सप्टेंबर रोजी निशाणा साधला. दरम्यान, एकीकडे महाराष्ट्रातील मतांवर डोळा ठेवून असंविधानिकपणे मराठी भाषेला अभिजात दर्जा दिला आहे. तर दुसरीकडे महाराष्ट्रातील १४ हजार मराठी शाळा बंद केल्या असून या दर्जाचा कोणाला उपयोग होणार असा हल्ला त्यांनी चढविला. धाराशिव शहरातील नगर परिषदेच्या छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात द्वेषमुक्त समाज आणि माणुसकीच्या नात्यासाठी दडपशाहीच्या विरोधात, लोकशाही रक्षणासाठी, सत्य ऐकायला या... लोकशाहीचे पांघरून घेतलेली हुकूमशाही.. आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. पुढे बोलताना ॲड.सरोदे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने राजकारण करणारी करणारी मंडळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यात भ्रष्टाचार करीत असल्याचा आरोप त्यांनी केला.

विशेष म्हणजे लोकशाहीचे विचार समजून घ्यायचे असतील तर छत्रपती शिवाजी महाराज पासून ते समजून घेणे



आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे संविधानाची हत्या करण्याच्या मानसिकतेचे आहेत. तसेच सध्या सर्वत्र कट्टरतावादी सर्वत्र फोफावत असून हे देशासाठी अत्यंत धोकादायक असल्याचे त्यांनी नमूद केले. तर राज्यामध्ये गायीवरून राजकारण सुरू असून गो सेवा व गो रक्षा हा विषय वेगळा असल्याचे सांगत गो रक्षा ज्या ठिकाणी येते तेथे राजकारण येत असल्याचे त्यांनी निक्षून सांगितले. एकीकडे सत्ताधारी मंडळी गायींना अनुदान देतात तर दुसरीकडे मुला-मुलींना अन्न मिळत नसल्यामुळे ते कुपोषित होऊन मरत आहेत.मात्र त्यांच्याकडे लक्ष द्यायला या मंडळींना वेळ नसल्याची जहरी टिका ही त्यांनी केली. सर्वात महत्त्वाचे म्हणजे शिक्षण,आरोग्य, हवा व पाणी याच्यावर तुम्ही लक्ष देणार आहात की नाही ? असा प्रश्न विचारत नागरिकांचे जीवन सुधारण्यासाठी काम केले पाहिजे असे आवाहन त्यांनी केले.